श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डाची स्थापना करणेबाबत .

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-२०१९/प्र.क्र.४१/उद्योग-६.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ५ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> : - शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-२०१८/प्र.क्र.७४/उद्योग-६, दिनांक ८ मार्च, २०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना सन १९६० च्या विधान मंडळ कायद्यानुसार झालेली आहे. ग्रामीण कारागीर व बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाच्या खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या तसेच राज्य शासनाच्या विविध योजना राबवित आहे.

राज्यातील कुंभार समाजातील उन्नतीसाठी व प्रगतीसाठी मंत्री वित्त यांनी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्ड, वर्धा येथे स्थापन करणेबाबत व त्यासाठी रु. १० कोटी इतकी तरतूद केली असल्याच्या घोषणेस अनुलक्षून राज्य शासनाने श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्ड वर्धा येथे दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयान्वये मातीकला बोर्ड कार्यान्वित करणेसाठी शासकीय/अशासकीय सदस्य असलेली तात्पुरती संरचना विहित करण्यात आलेली आहे. सदर संरचनेतील अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डावरील संरचनेत खालील नमूद अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यास या शासन निर्णयाद्ववारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	मातीकला बोर्डाची संरचना	पदनाम
१.	श्री. संजय गाते, वर्धा	कार्याध्यक्ष
२.	श्री. उत्तमराव गोरडवार, नांदेड	अशासकीय सदस्य
३.	श्रीमती रसिका राकेश खेडेकर, रत्नागिरी	अशासकीय सदस्य
४.	श्रीमती शुभांगी बबन खैरकर, मुंबई.	अशासकीय सदस्य
५.	श्री. विलास हरी गुडेकर, सिंधुदुर्ग	अशासकीय सदस्य
६.	श्री. चंदन मनीराम प्रजापती, नागपूर	अशासकीय सदस्य
७.	श्री. नरेश जुगेले, नागपूर	अशासकीय सदस्य

श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डाच्या संरचनेतील शासकीय सदस्यांची नेमणूक/नियुक्ती शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच राहील. तसेच सदर बोर्डाचा कार्यकाल ५ वर्ष अथवा शासन यासंदर्भात निर्णय घेईल, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता राहील. सदर समितीतील कोणत्याही अशासकीय सदस्याला काढून टाकणे व त्याच्या ठिकाणी अन्य अशासकीय सदस्याची नेमणूक करणे याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा राहील.

२. श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डासंदर्भात शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अन्य तरतूदी कायम राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०८०५१२४४५६७३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Karansing
Premsing Patil

Digitally signed by Karansing Premsing Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f2521c3a6d1f8429a3c2c9a42d575298ae82956908d63df441063695f377819, serialNumber=c7feed7178d6c14666a5df36811f1763590e65b6f836a87e63789dc234173d66, cn=Karansing Premsing Patil
Date: 2019.08.05 12:55:00 +05'30'

(क. प्रे. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.सभापती, विधानपरिषद/मा.अध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई.
८. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई (या शासन निर्णयाच्या प्रती सर्व संबंधित शासकीय/ अशासकीय सदस्यांना देण्यात याव्यात.)
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई
११. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा), मुंबई -१/नागपूर -२ (२ प्रती)
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई(२ प्रती).
१३. सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई .
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालये (सर्व जिल्हे).
१५. निवडनस्ती (उद्योग-६).